सकाळ

# शाहू महाराजांच्या कार्याचा बहुमोल दस्तऐवज वाचकांच्या हाती

## डॉ. देवानंद शिंदे; १३५ वर्षांपूर्वीच्या पुस्तकाचे पुनःप्रकाशन

**कोल्हापूर, ता. ३० :** ''श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या 'दत्तक विधानाची हकिकत' या मूळ पुस्तकात राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची तपशीलवार व बारकाईने मांडणी केली आहे. अशा पुस्तकाचे पुनःसंपादन व मुद्रण डॉ. विलास पोवार यांनी केले. त्यातून शाहूंच्या कार्याचा बहुमोल दस्तऐवज वाचकांच्या हाती येण्यास मदत झाली,'' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केले.

'श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तक विधानाची हकिकत' या सदाशिव देशपांडे (हेडमास्तर) यांनी १८८५ मध्ये लिहिलेल्या पुस्तकाचे पुनःसंपादन व मुद्रण डॉ. पोवार यांनी केले. पुस्तकाचे पुनःप्रकाशन डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले.



**कोल्हापूर : येथे 'दत्तक विधानाची हकिकत' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना डॉ. देवानंद शिंदे. शेजारी इतिहासप्रेमी.**

या वेळी पोवार म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराजांना प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या, त्यात दादू माहूत, गणू साठमारी अशा शाहू महाराजांच्या दरबारात काम केलेल्यांशी बोलता आले. त्यात दत्तविधानपासून राज्यकारभारापर्यंतचे अनेक महत्त्वपूर्ण तपशील होते. त्याची सविस्तर माहिती वाचकांसमोर यावी, यासाठी या पुस्तकाचे पुनःसंपादन व मुद्रण केले.'' डॉ. बी. डी. खणे, डॉ. अरुण भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. चित्रकार संजय शेलार व मुद्रक चंद्रकांत पोतदार यांचा सत्कार झाला. ॲड. अभिजित चव्हाण यांनी आभार मानले.

# 'दत्तकविधान हकीकत' व्यवस्था परिवर्तनासाठी : कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**


शाहू विचारांचे आणि कार्याचे निरीक्षण पुस्तकात मांडण्यात आले आहे. व्यवस्था परिवर्तनाला हे पुस्तक उपयोगी ठरेल, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले.

श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तकविधानाची हकिकत या १८८५ रोजी प्रकाशीत झालेल्या पुस्तकाचे पुनर्मुद्रण प्राचार्य डॉ.विलास पोवार यांनी केले आहे. या संपादित पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी शाहू स्मारक येथे करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी इतिहास संकलन समितीचे डॉ. बी. डी. खणे, माजी इतिहास प्रमुख शिवाजी विद्यापीठाचे डॉ.अरुण भोसले यांची होती. स्वागत प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी केले.

यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शाहू विचारांची आणि दत्तकविधान हकिकतीची तर्कशुद्ध मांडणी पुस्तकातून करण्यात आली आहे. शाहू विचारांचे आणि कार्याचे निरीक्षण पुस्तकात मांडण्यात आले आहे. व्यवस्थापरिवर्तनाला हे पुस्तक उपयोगी ठरेल. या पुस्तकामुळे वाचकांना शाहू महाराजांच्या जीवन कार्याची परिपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. डॉ. अरुण भोसले म्हणाले, छत्रपती शाहूंचे जीवन कार्य हा अभ्यासाचा विषय आहे. पोवार यांनी मोठे परिश्रम घेऊन हे पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. या पुस्तकातून त्या काळातील बारकावे आणि सत्य समाजासमोर यायला मदत होणार आहे. छत्रपती शाहू महाराज हे नव्या पिढीला उमगावेत यासाठी या विषयावर नवनवीन संशोधन होणे आवश्यक आहे. डॉ. बी. डी. खणे म्हणाले, आज जे काही छत्रपतींवरील साहित्य उपलब्ध आहे त्याचे संपूर्ण श्रेय शिवाजी विद्यापीठाला जाते. छत्रपती शाहू महाराजांचे जीवन कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. छत्रपती शाहू अभ्यासायचे तर १९१८ ते २२ या काळातील त्यांचे साहित्य अभ्यासावे. त्यांच्या जीवनामध्ये त्यांचे गुरू एस. एम. फ्रेजर यांचे मोठे स्थान होते. त्यांनी शाहूंना बहुमोल मार्गदर्शन केले.

दरम्यान, विलास पोवार यांनी पुस्तकाच्या पुनर्निर्मितीसंदर्भात माहिती उपस्थितांना दिली. त्यामध्ये १३५ वर्षांपूर्वीचा हा जुना ठेवा कसा संकलित केला. त्यामध्ये आलेल्या अडचणी याबाबत माहिती दिली. पुस्तकातील घटनांच्या संशोधनासाठी भेटलेले तज्ज्ञ अभ्यासक, जुन्या संदर्भाची माहिती असणारी मंहळी. त्यांनी दिलेली माहिती याबाबतचे विश्लेषण पोवार यांनी केले. आभार अजित चव्हाण यांनी मानले. यावेळी संजय शेलार, चंद्रकांत पोतदार, देवस्थान सचिव विजय पोवार यांच्यासह पुस्तकप्रेमी उपस्थीत होते.



**कोल्हापूर : विलास पोवार संपादित पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. बी. डी. खणे, अरुण भोसले आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

# गरजाधिष्ठित ई-कंटेंट निर्मिती काळाची गरज : डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यार्थांच्या अध्ययन पद्धतीमध्ये काळानुसार बदल होत आहेत. त्याला तांत्रिक ज्ञानाची जोड देऊन गरजाधिष्ठित ई-कंटेंट निर्मिती करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रातर्फे ई-कंटेंट डेव्हलपमेंट या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले की, बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार आयटीसीचा वापर करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण अभ्यास साहित्य देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दूरशिक्षण केंद्राच्या प्रत्येक अभ्यासक्रमावर आधारित ई-कंटेंट होणे गरजेचे आहे. ई-कंटेंटमुळे शिवाजी विद्यापीठ शैक्षणिक दृष्टिकोनातून मुख्य प्रवाहात सामील होईल. विविध कोर्सचे छापील स्वयंअध्ययन साहित्य देऊ शकत नाही. विद्यार्थ्यांना व्हिडीओ आधारित ई-कंटेंटद्वारे अभ्यास साहित्य दिल्यास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राव्यतिरिक्त आपण ज्ञान देण्याचे काम करू शकतो. शिवाय त्यासाठी कोणत्याही मर्यादा असणार नाहीत, असे डॉ. शिर्के म्हणाले.

प्रास्ताविक दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. एन. जे. बनसोडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन माधुरी गुरव यांनी केले. डॉ. आर. यू. संकपाळ यांनी आभार मानले.

कार्यशाळेसाठी दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, पुणे येथील शैक्षणिक माध्यम विकसन संशोधन केंद्राचे तांत्रिक तज्ज्ञ श्रीकांत ठकार, विनोद कल्गी, वाणिज्य विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. प्रकाश पवार, श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव डॉ. एम. जे. बनसोडे, शिवाजी विद्यापीठाचे डॉ. डी. बी. सुतार, ई-कंटेंट समन्वयक डॉ. एस. व्ही. थोरात, कार्यशाळा समन्वयक डॉ. आर. यू. संकपाळ, विविध विभागप्रमुख, दूरशिक्षण केंद्राचे सहयोगी व सहायक प्राध्यापक, समन्वयक उपस्थित होते.

# ‘ई-कंटेंट’ निर्मिती काळाची गरज

## प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थांच्या अध्ययन पद्धतीमध्ये काळानुसार बदल होत आहेत. त्याला तांत्रिक ज्ञानाची जोड देऊन गरजाधिष्ठित ई-कंटेंट निर्मिती करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने ‘ई-कंटेंट डेव्हलपमेंट’ या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रा. शिर्के म्हणाले, बदलत्या जागतिक परिस्थतीनुसार आयटीसीचा वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण अभ्याससाहित्य देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दूर शिक्षण केंद्राच्या प्रत्येक अभ्यासक्रमावर आधारित ई-कंटेंट होणे गरजेचे आहे. दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे यांनी स्वागत केले. डॉ. एन. जे. बनसोडे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. माधुरी गुरव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. यू. संकपाळ यांनी आभार मानले. याप्रसंगी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक प्रा. डॉ. नमिता खोत, पुणे येथील शैक्षणिक माध्यम विकसन संशोधन केंद्राचे तांत्रिक तज्ज्ञ श्रीकांत ठकार, कार्यशाळा समन्वयक डॉ. आर. यू. संकपाळ उपस्थित होते.

पुढारी

# एक तासाचा अंधार करी जीवन प्रकाशमान

## ‘अर्थ अवर’ उपक्रमातून ऊर्जा बचतीबरोबरच कार्बन डायऑक्साईडला आळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एरवी मावळतीच्या सूर्यापाठोपाठ लोकांना लख्ख प्रकाश देणारे शहरातील स्ट्रीट लाईट्स ऐन अंधारातच बंद करण्यात आले होते. दुसरीकडे, ऐतिहासिक बिंदू चौकात पारंपरिक पणत्यांचा वापर करून ‘६० प्लस’ हा लोगो साकारून त्यातून ‘ऊर्जा बचती’साठीचे आवाहन करण्यात आले. निमित्तं होतं ‘अर्थ अवर’ या अनोख्या उपक्रमाचे. ‘एक तासाचा अंधार करी जीवन प्रकाशमान’ असा जणू संदेशच देण्यात आला.

महापालिका व सृष्टी नेचर क्लब आयोजित उपक्रमाला डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ, महावितरण, ६० प्लस अर्थ अवर, डब्ल्यू-डब्ल्यू-एफ, ‘सह्याद्री’ भटकंती निसर्गाची, या संस्था-संघटनांचे पाठबळ लाभले. राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस.एस.) च्या २०० स्वयंसेवकांनी २ हजार पणत्यांच्या साहाय्याने ‘६० प्लस’ या लोगोतून लोकांना ऊर्जा बचतीचा संदेश दिला. यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, अधिष्ठाता डॉ. ए. ए. राठोड, प्राचार्य डॉ. ए. एन. जाधव, उपप्राचार्य डॉ. क्षमा कुलहल्ली, प्रा. राजेंद्र रायकर, प्रा. डॉ. राहुल पाटील आदी उपस्थित होते. उपक्रमाचे संयोजन वैष्णवी कानेटकर, काशिनाथ लटपटे, धनंजय शेंद्रे, अक्षय पाटील, प्रतीक्षा पोवार, ऋतुजा पाटील, ओम वासवानी, धनराज धांडगे आदींनी केले.



**कोल्हापूर : ३० मार्च रोजी जगभर ‘अर्थ अवर’ हा ऊर्जा बचतीबाबतचा उपक्रम साजरा करण्यात आला. यांतर्गत शहरातील स्ट्रीट लाईट्स बंद ठेवण्यात आले होते. यामुळे निर्माण झालेल्या अंधारात वाहनांचे लाईट्स असा कलात्मक आभास निर्माण करत होते. कावळा नाका येथील ताराराणी चौकात तय्यब अली यांनी टिपलेले हे दृश्य.**

### २१ लाख ९२ हजार वॅट ऊर्जेची बचत

शहरातील २५० वॅटचे २५०० बल्ब, ५.५ किलो वॅटचे ३५ हायमास्ट दिवे व सोडियम व्हेपरचे ५५०० दिवे, ४० वॅटच्या काही ट्युबलाईट असे २५ हजार स्ट्रीट लाईट सायंकाळी साडेसात ते साडेआठ या वेळेत बंद ठेवले. तासाच्या उपक्रमातून सुमारे २१ लाख ९२ हजार ५०० वॅट इतकी ऊर्जाबचत करण्यात आली.

### २००७ पासून ‘अर्थ अवर’ उपक्रम

पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी ऊर्जा बचतीच्या उद्देशाने सन २००७ मध्ये सिडनी शहरात ‘अर्थ अवर’ उपक्रमाची संकल्पना मांडण्यात आली. लिओ बर्नेट व डब्ल्यू. डब्ल्यू. एफ. या एनजीओने ही संकल्पना मांडली. जगभरातील १५२ देशांत हा उपक्रम साजरा केला जातो. यात लाखो लोक सहभागी होत असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

### आरोग्यदायी तास

६० वॅटच्या एका घरगुती बल्बच्या एका तासाचा वापर ६० ग्रॅम कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन होण्यास कारणीभूत ठरते. याचा परिणाम पर्यावरणावर होतो. ग्लोबल वॉर्मिंगप्रमाणे जीवसृष्टीवर घातक परिणाम होत आहेत. श्‍वसन विकारासारख्या गंभीर समस्यांना यामुळे सामोरे जावे लागत आहे. ‘अर्थ अवर’च्या माध्यमातून तासभर का होईना आरोग्यदायी वातावरण अनुभवल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केल्या.

### देशातील ५७ शहरे

भारतातील ५७ शहरे या उपक्रमात सहभागी होतात. इंडिया गेट, मैसूर पॅलेस, गेट वे ऑफ इंडिया, व्हिक्टोरिया मेमोरियल या ऐतिहासिक स्थळांबरोबरच राष्ट्रपती भवन, पंतप्रधान व मुख्यमंत्री यांची निवासस्थाने येथे एक तास वीज बंद ठेवण्यात आली. नेल्सन मंडेला, सचिन तेंडुलकर, आमीर खान, अभिषेक बच्चन, विद्या बालन अशा मान्यवरांनी या मोहिमेसाठीची जनजागृती केली आहे.

सकाळ

# ‘अर्थ अवर’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## पर्यावरण संवर्धन; पणत्यांनी उजळला ऐतिहासिक बिंदू चौक

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३० : उर्जेची बचत करण्याचा संदेश देणाऱ्या अर्थ अवर उपक्रमात आज सायंकाळी एक तास वीज बंद ठेवून नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डी. वाय. पाटील महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ, महावितरण, महापालिका, डब्ल्यू. डब्ल्यू. एफ., सह्याद्री संस्था यांनीही सक्रिय सहभाग नोंदविला. बिंदू चौकात सायंकाळी साडेसात ते साडेआठ या वेळेत डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पणत्यांच्या सहाय्याने सिक्स्टी प्लस अर्थ अवर लोगो बनविला होता.**



**कोल्हापूर : अर्थ अवर उपक्रमात बिंदू चौकात पणत्या प्रज्वलित करताना डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी.**

ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे वर्ल्ड वाइल्ड फंड संस्थेने ३० मार्च २००७ मध्ये अर्थ अवर उपक्रमाची सुरुवात केली होती. या दिवशी संध्याकाळी एक तास वीज बंद ठेवली जाते.

डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजने पुढाकार घेऊन कोल्हापुरात उपक्रम सुरू केला. बिंदू चौकामध्ये सिक्स्टी प्लसचा लोगो पणत्यांनी साकारला. अंधारामध्ये हा सारा परिसर पणत्यांनी उजळून निघाला.

जिमखाना प्रमुख प्रा. राजेंद्र रायकर म्हणाले, ६० वॅटच्या बल्बमुळे एका तासात ६० ग्रॅम कार्बन डायऑक्साईट उत्सर्जन होण्यास कारणीभूत ठरते. ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणाऱ्या समस्या, जीवसृष्टीवर होणारा प्रतिकूल परिणाम, श्वसनविकार यांसारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा वेळी समाजात ऊर्जा बचतीचा विचार रुजवण्यासाठी अर्थ अवर उपक्रम उपयुक्त आहे.''

आमदार सतेज पाटील, संस्थेचे अध्यक्ष संजय. डी. पाटील, आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांच्या प्रोत्साहनाने उपक्रम पार पडला. डी. वाय. पाटील संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, प्राचार्य डॉ. ए. एन. जाधव, अधिष्ठाता डॉ. ए. ए. राठोड, डॉ. प्रमोद चौगुले, प्रा. डॉ. राहुल पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी काशीनाथ लटपटे, वैष्णवी कानिटकर, धनंजय शेंद्रे, अक्षय पाटील, धनराज दांडगे यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वी झाला.

### २१ लाखांवर किलोवॉट वीज बचत

महापालिकेने २५० वॉटचे २५०० बल्ब, ५.५ कि.वॉटचे ३५ हायमास्ट दिवे, सोडियम व्हेपरचे सुमारे ५५०० दिवे, ४० वॅटचे ट्यूबलाईट असे सुमारे २५,००० स्ट्रीट लाईट बंद ठेवल्या होता. यातून २१ लाख, ९२ हजार, ५०० किलोवॉट ऊर्जा बचत झाल्याचा दावा आयोजकांनी केला आहे.

Kolhapur, Main
31/03/2019 Page No. 3

# खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी सिद्ध व्हावे

## गिरीजा पाटील-देसाई, शिवाजी विद्यापीठात 'कलर्स-२०१७' समारंभ उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या 'कलर्स' विजेत्या क्रीडापटूंनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांत यश मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले आहे. त्यांनी आता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःचे कौशल्य दर्शविण्यासाठी सिद्ध व्हावे, असे आवाहन आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू व ठाण्याच्या वनाधिकारी गिरीजा संदीप पाटील-देसाई यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे २०१७-१८ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ (कलर्स-२०१७) मानव्यशास्त्र सभागृहात झाला. त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

गिरीजा पाटील-देसाई म्हणाल्या, आंतरविद्यापीठ स्पर्धांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर चमक दाखविल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकण्याची जिद्द खेळाडूंच्या मनात जागली पाहिजे.



**कोल्हापूर : क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन न्यू कॉलेजचे प्राचार्य आणि संघास गौरवताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, गिरीजा देसाई आदी.**

त्यासाठी जागतिक स्तरावरील क्रीडा क्षेत्रातील प्रवाह काय आहेत, याची माहिती खेळाडूंनी करून घ्यायला हवी. त्यासाठी तंत्रज्ञानाचा सदुपयोग करून घ्यावा.

क्रीडापटूंसाठी राज्य तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये पाच टक्के राखीव जागा असतात, त्याचाही लाभ घ्यायला हवा. त्यासाठी स्पर्धा परीक्षांचा सराव करणे आवश्यक असल्याचे सांगून पाटील यांनी तेजस्विनी सावंत, वीरधवल खाडे, राही सरनोबत असे आम्ही सारेच शासकीय सेवेत आपापल्या कामाचा ठसा उमटविण्यात यशस्वी झालो आहोत, असे अभिमानपूर्वक नमूद केले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा लौकिक देशभरात उंचावण्यात क्रीडापटूंचे योगदान मोलाचे आहे. केवळ पारंपरिक खेळांतच नव्हे, तर रग्बी, ग्रीको-रोमन कुस्ती, फेन्सिंग अशा क्रीडा प्रकारांतही त्यांनी यश मिळविले आहे.

२०१७-१८ या शैक्षणिक वर्षात झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक प्रकारांत पाच सुवर्ण, पाच रौप्य व तेरा कांस्य अशी एकूण २३ पदके मिळविणाऱ्या आणि २१ व्या राज्य आंतरविद्यापीठ क्रीडामहोत्सव-२०१७ मध्ये सहा सुवर्ण, आठ रौप्य व सात कांस्य अशी एकूण २१ पदके प्राप्त करणाऱ्या क्रीडापटूंचा गिरीजा पाटील-देसाई यांच्या हस्ते ब्लेझर, स्मृतिचिन्ह, पुस्तक व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

शिवछत्रपती पुरस्कार विजेता अक्षय मधुकर देशमुख (तलवारबाजी), खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक विजेती अश्विनी राजेंद्र मळगे (वेटलिफ्टिंग), सुवर्ण विजेता ओंकार मारुती हंचनाळे (खो-खो), कांस्य विजेती मयूरी रामचंद्र देवरे (वेटलिफ्टिंग) यांना गौरविण्यात आले. कोलंबो (श्रीलंका) येथे झालेल्या आयर्नमन स्पर्धेत (२ किमी जलतरण+ १० किमी सायकलिंग+ २१ किमी धावणे) महाराष्ट्राकडून सर्वाधिक जलद वेळ (६ तास १० मि.) नोंदवून फ्रान्स येथील स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विवेकानंद कॉलेजच्या सुप्रिया विराज निंबाळकरचा गौरव करण्यात आला.

प्रशिक्षक जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ दिली. प्रास्ताविक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बाबासाहेब उलपे यांनी आभार मानले. शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, छत्रपती पुरस्कार विजेते संभाजी पाटील यांच्यासह शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडापटू, पालक उपस्थित होते.

### न्यू कॉलेजचा गौरव

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विशेष प्रावीण्य मिळवून सर्वाधिक गुण संपादन केल्याबद्दल दि न्यू कॉलेज यांना २०१७-१८ चे खेळांमधील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. न्यू कॉलेजने सलग तिसऱ्यांदा हा बहुमान पटकावला आहे. कॉलेजतर्फे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंनी हा गौरव स्वीकारला.

**मटा अँकर** आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता; वनस्पतीला कोल्हापूरच्या संशोधकाचे नाव

# आंबोलीत सापडली वनस्पतीची नवी प्रजात


Gurubal.Mali
@timesgroup.com
Tweet : gurubalmaliMT


**कोल्हापूर : आंबोलीच्या जंगलातील वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी फिरताना अचानक एक नवीन वनस्पती दिसली. ती प्रयोगशाळेत तपासली. वनस्पतींविषयक शब्दकोशांमध्ये माहिती घेतली. मात्र त्याची कुठेच नोंद नसल्याचे आढळले. त्यामुळे त्यावर अधिक संशोधन करत एका नव्या प्रजातीचा कोल्हापूच्या संशोधकांनी शोध लावला. विशेष म्हणजे त्याचे 'बोनय्या मिलिंदी' असे नामकरण करतानाही कोल्हापूरच्याच सुपुत्राचे नाव देत त्यांच्या या क्षेत्रातील कार्याचा गौरव करण्यात आला.**




न्यू कॉलेजचे प्राध्यापक डॉ. विनोद शिंपले आणि संशोधक विद्यार्थी विनायक सरदेसाई यांच्या या संशोधनामुळे पश्चिम घाटातील वनस्पतीला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवी ओळख मिळाली आहे. 'बोनय्या मिलिंदी' या नावावर लंडनच्या रॉयल बोटॅनिक गार्डन या संस्थेने नामांकनाची मोहोर उठवली.


पश्चिम घाटात विविध वनस्पतींची रेलचेल आहे. निसर्ग सौंदर्याने नटलेल्या या घाटात वनस्पतींच्या विविध प्रजाती आढळतात. येथील बहुतांशी वनस्पतींच्या नोंदी झालेल्या असल्या तरी अद्याप काही संशोधकांपासून दूर आहेत. अनेक संशोधक या परिसरात अभ्यास करत असतात. यातून अनेक नव्या प्रजातीचा शोध लागला आहे. प्रा. शिंपले आजरा व आंबोली परिसरातील ओढ्याकाठी फिरत असताना त्यांना एक नवीन वनस्पती दिसली. आतापर्यंतच्या अभ्यासात याचा कुठेच उल्लेख दिसला नव्हता. उत्सुकतेपोटी त्यांनी अधिक संशोधन केले. जवळपास दोन वर्षाच्या संशोधनानंतर अखेर त्याला नाव मिळाले. 'बोनय्या मिलिंदी' या नावावर लंडन येथील रॉयल बोटॅनिकल गार्डन या संस्थेने नामांकनावर मोहोर उठवली.



प्रा. डॉ. विनोद शिंपले



विनायक सरदेसाई



महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात पसरलेल्या पश्चिम घाटातच ही वनस्पती आढळून येते. बोनय्या वनस्पतीच्या जगात बारा प्रजाती आढळतात. त्यापैकी ही प्रजाती इतर प्रजातींपेक्षा वेगळी आहे. यामध्ये वंध्य पुंकेसर (स्टॅमीनोड्स) हे पाकळ्यासारखे असतात. अशाप्रकारचे पुंकेसर असलेली जगातील एकमेव प्रजाती आहे, असे प्रा. शिंपले यांनी सांगितले.

या वनस्पतीचा शोध लागल्यानंतर त्याला कोल्हापूरच्याच सुपुत्राचे नाव देण्याचा प्रस्ताव पुढे आला. मूळचे पन्हाळा येथील रहिवासी आणि सध्या पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठात असलेले वनस्पतीशास्त्र संशोधक डॉ. मिलिंद सरदेसाई यांचे नाव देण्याचे ठरले. त्यांनी या क्षेत्रात पंचवीस वर्षांत मोलाची कामगिरी केली आहे. अनेक नवीन प्रजातींचा शोध घेण्याबरोबरच 'फ्लोरा ऑफ कोल्हापूर' हे पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. त्यामुळे कार्याचा गौरव म्हणून 'बोनय्या मिलिंदी'हे नाव देण्यात आले.



**वनस्पती संशोधनात गेले पंचवीस वर्षे कार्यरत आहोत. एखाद्या वनस्पतीला नाव दिले जाणे हा गौरवाचा क्षण आहे. यामुळे नव्या दमाने संशोधन करण्याची उर्मी मिळाली.**

प्रा. डॉ. मिलिंद सरदेसाई,
पुणे विद्यापीठ

**बोनय्या मिलिंदी' ही वनस्पती ओढ्याकाठी आढळते. अलिकडे ओढे बुजवले जात असल्याने दुर्मिळ वनस्पती नष्ट होण्याचा धोका आहे.**

प्रा. डॉ. विनोद शिंपले,
संशोधक, न्यू कॉलेज

पुढारी

# अभियांत्रिकीच्या परीक्षा मेच्या पहिल्या आठवड्यात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अभियांत्रिकीच्या परीक्षा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार आहेत. त्यापार्श्‍वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाकडून वेळापत्रकात दुरुस्ती करण्यात येत आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने अभियांत्रिकीच्या परीक्षा घेण्याचे नियोजन सुरू आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २२ महाविद्यालयांत सुमारे ८० हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्‍वभूमीवर शासनाच्या परिपत्रकानुसार ११, १८, २३, २९ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या वेळेत परीक्षा घेता येत नाहीत. पुनर्परीक्षार्थी (रिपीटर) विद्यार्थ्यांच्या परीक्षा २० एप्रिल व नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षा २ मेपासून सुरू होणार होत्या. अभियांत्रिकी विभागाच्या परीक्षा पूर्ववत नियोजित वेळेत घेण्यात याव्यात, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी विद्यार्थी संघटनांतर्फे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे **पान ८ वर**

# अभियांत्रिकीच्या परीक्षा मेच्या पहिल्या आठवड्यात

**(पान १ वरून)** यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्यानुसार परीक्षा विभागाने वेळापत्रकात बदल करण्याचे काम सुरू केले आहे. पुनर्परीक्षार्थी (रिपीटर) परीक्षांना २५ एप्रिल व नियमितच्या परीक्षा ६ ते ७ मे पासून प्रारंभ होणार आहे. कोणत्याही अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी घेतील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

अभियांत्रिकी परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या सुमारे अडीज हजार उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू आहे. परीक्षा सुरु होण्याच्या आठवडाभर अगोदर कामकाज पूर्ण करण्यात येणार असल्याचे समजते.

# ‘पारदर्शक कारभारासाठी माहिती अधिकाराचा उपयोग व्हावा’

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माहिती अधिकाराचा वापर काही लोक हिंसक प्रवृत्तीमुळे सतत दुसऱ्याला त्रास देण्यासाठी करतात, ही बाब अनुचित आहे. शिवाजी विद्यापीठ हे गतिमान व पारदर्शक कारभाराच्या उपाययोजनांसाठी या कायद्याच्या वापराचा योग्य उपयोग करेल, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ हिंदी विभागातर्फे ‘माहिती अधिकार अधिनियम २००५’ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. अध्यक्षस्थानी हिंदी विभागाचे माजी अध्यक्ष डॉ. पांडुरंग पाटील होते. तीन सत्रांमध्ये कार्यशाळा झाली. निवृत्त प्राचार्य व माहिती अधिकार कार्यकर्ता शिवाजी राऊत यांनी ‘माहिती अधिकार : हेतू व उपयोजन व माहिती अधिकार कलमनिहाय अन्वय व अंमलबजावणीची कार्यप्रणाली’ या विषयांवर मार्गदर्शन केले. ॲड. अचल मंडलिक-रणदिवे यांनी माहिती अधिकाराचा उपयोग व्यापक जनहितार्थ करणे बंधनकारक असल्याचे सांगितले. कार्यशाळेचे समारोप वाणिज्य विभाग प्रमुख व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांच्या उपस्थितीत झाला. अभिलेखे व्यवस्थित ठेवल्यास बऱ्याच अडचणी टाळता येऊ शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले. हिंदी विभागप्रमुख प्रा. पद्मा पाटील यांनी प्रास्ताविक केले.